जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाचा निधी जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रण अधिकारी सांकेतांकाखाली वितरीत करण्याकरीता प्रत्येक जिल्हाधिकारी यांना स्वतंत्र नियंत्रण अधिकारी सांकेतांक देणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: विघयो २०१८/प्र.क्र. १८/अर्थसंकल्प
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - २८ मार्च, २०१८

<u>वाचा</u> : १) सा.न्या.व वि.स.वि., शा.नि.क्र. विघयो-२०१७/प्र.क्र.२६/विघयो, दि. १३ .४.२०१७
२) सा.न्या.व वि.स.वि,शासन पत्र.क्र. विघयो-२०१७/प्र.क्र.२६ /विघयो, दि. २४.७ २०१७

<u>प्रस्तावना</u>-

शासन निर्णय दि. १३ एप्रिल,२०१७ नुसार, सन २०१७-१८ पासून जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाचा निधी हा जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली देण्यात आला असून, त्याकरिता जिल्हाधिकारी हे त्या जिल्हयाच्या अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासाठी निधी वाटपासंबंधात नियंत्रक राहतील व त्यांना प्राप्त झालेल्या निधीचे कार्यान्वयीन यंत्रणेला पुनर्वाटप करण्यास सक्षम राहतील. अनुसूचित जाती घटक कार्यक्रम जिल्हा योजनेच्या निधी विनियोगाची (प्रशासकीय मान्यता देणे, निधी वितरण करणे व पुनर्विनियोजन करणे) संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

२. जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी यांना प्राप्त निधी संबंधित यंत्रणेस वितरीत करण्यासाठी सहाय्यक आयुक्त यांच्याकडे सदरचा निधी वर्ग करुन, सहाय्यक आयुक्त यानी योजनेच्या मंजूरीनुसार संबंधित योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणेस वितरीत करावयाचा आहे.

३. तथापि, अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गतच्या जिल्हा वार्षिक योजनांचा निधी नियंत्रक अधिकारी म्हणून सबंधित जिल्हाधिका-यांच्या अधिनस्त तहसिलदार, संजय गांधी निराधार अनुदान योजना, यांच्या नियंत्रक सांकेतांकावर उपलब्ध होत असल्याने, सदर निधीचे वाटप करण्यास तांत्रिक व प्रशासकीय अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गतचा जिल्हा वार्षिक योजनांचा निधी सहायक आयुक्त, समाजकल्याण यांना सुलभतेने वितरीत करणे शक्य व्हावे, ऑनलाईन पध्दतीने बीम्स प्रणालीवर जिल्हा वार्षिक योजनेची जिल्हानिहाय तरतुद भरणे तसेच पुनर्विनियोजन करणे सुलभ व्हावे म्हणून जिल्हानिहाय स्वतंत्र नियंत्रक अधिकारी सांकेतांक देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत निधी वितरणातील अडचणींचा विचार करता, निधी वितरणातील विलंब दुर करण्यासाठी तसेच जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाचा निधी जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रण अधिकारी सांकेतांकाखाली वितरीत करण्याकरीता प्रत्येक जिल्हाधिकारी यांना स्वतंत्र नियंत्रण अधिकारी सांकेतांक देण्यासाठी या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.स.क्र.७३/२०१८/व्यय १४, दि. २७.०२.२०१८ अन्वये दर्शविलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३२८१७१०५४२७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pooja Bhaskar Udawant

Digitally signed by Pooja Bhaskar Udawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistant, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3a216aeb67842b82e08ea38ee54173f5a527cd40299fd7cb135e0abc12d5ab49, cn=Pooja Bhaskar Udawant
Date: 2018.05.05 12:00:29 +05'30'

(पुजा भा.उदावंत)
कक्ष अधिकारी

प्रति,

१. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३. सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती
४. सह आयुक्त (अनुसूचित जाती घटक कार्यक्रम), समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
६. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण (२ प्रती)
७. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण (२ प्रती)
८. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी (जिल्हा परिषद) (२ प्रती)
९. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (२ प्रती)
१०. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
११. महालेखापाल १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३. वित्त विभाग (व्यय-१४/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
१४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

प्रत, माहितीसाठी अग्रेषित -

१. शासनाचे मुख्य सचिव,
२. मा.राज्यपालांचे सचिव
३. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
५. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
७. मा.राज्य मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव

शासनाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
(अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाशी संबंधित सर्व खालील विभाग)

८. ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई

११. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग), मंत्रालय, मुंबई
१२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई
१३. कृषी व पदुम विभाग (कृषि), मंत्रालय, मुंबई
१४. कृषी व पदुम विभाग (पदुम), मंत्रालय, मुंबई
१५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (सहकार, पणन), मंत्रालय, मुंबई
१६. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (वस्त्रोद्योग), मंत्रालय, मुंबई
१७. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. सामान्य प्रशासन विभाग (माहिती व जनसपर्क), मंत्रालय, मुंबई
२२. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
२३. नियोजन विभाग (का.१४८१ / का.१४१३ / का.१४१४/ का.१४११), मंत्रालय, मुंबई
२४. वित्त विभाग, व्यय-१, (अर्थ-३/७), मंत्रालय, मुंबई
२५. सर्व विभागीय आयुक्त,
२६. सर्व विशेष कार्य अधिकारी (नियोजन) विभागीय आयुक्तांची कार्यालये,
२७. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२८. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
२९. संचालक, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राज्य शाखा, पुणे.
३०. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती / जमाती आयोग, वरळी, मुंबई,
३१. अध्यक्ष, अनुसूचित जाती कल्याण समिती, विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
३२. सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ,
नवीन प्रशासकीय इमारत, १८ वा मजला, मुंबई,
३३. सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत,
जिल्हाधिकारी कार्यालय कम्पाऊंड, तळमजला, औरंगाबाद,
३४. सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ,बी-२३/१, साऊथ अंबाझरी मार्ग,
अंध विद्यालयाजवळ, नागपूर,
३५. निवड नस्ती/अर्थसंकल्प (विघयो)